**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.फकरुद्दिन शरफुद्दीन शेख
गोदावरी बी/५, सिध्दिविनायक नगरी, निगडी, पुणे ४११०४४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७९ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ प्रतिनिधी श्री.रामदास तांबे

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ श्री.रामदास तांबे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
| --- | --- |
| | गोदावरी बी सहकारी गृह.संस्थेने आपल्या कार्यालयात पाण्याच्या कनेक्शनकरिता अर्ज केला आहे का, प्रत. २००५-२००६ या वित्तीय वर्षात महानगरपालिकेचे पाण्याचे दर म.न.पा. हद्दीत व हद्दीबाहेर एक इंच, अर्धा इंच पाईपलाईनला किती व हजार लिटरला किती, सोसायटीस कोणत्या दराने आकारतात, संस्थेस वैयक्तिक पाणी कनेक्शन हवे असल्यास त्याची प्रोसिजर काय, पाण्याच्या कनेक्शनकरता म.न.पा.चे बायलॉज काय आहेत, आमच्या संस्थेस १.४.२००६ ते ३१.३.२००६ या कालावधीचे पाण्याचे बिल पाठविले आहे ते कोणत्या मिटरप्रमाणे, मिटरक्रमांक, हा मिटर कोठे बसविला आहे, बिलाची तारीख, मिटर निरीक्षकाचे नांव, प्रभाग अधिकाऱ्याचे नाव, मिटर बंद असल्यास सरासरी बिल कसे आकारतात, मिटर कधी बंद पडले, तोपर्यंत किती पाणी दिले याचा तपशील द्यावा, दि.२४.४.२००६ रोजी महानगरपालिकेच्या ठराव क्र.५८०८, विषय क्र.१४ हा ठरावा स.नं.२४ व २६ सिध्दीविनायक व श्रीनगरीमधील रहिवाशांकरता निवासी दराप्रमाणे ठरावा पास केला आहे, त्यासाठी नगरपालिका काय व्यवस्था करणार आहे, प्रत्येक सोसायटीच्या ग्राऊंडच्या पाण्याच्या टाकीत नगरपालिका टाकीजवळ मिटर बसवून पाणी सोडणार आहे का, संपूर्ण तपशील. |

## विवेचन

पाण्याचे कनेक्शन व बिल आकारणी या संदर्भात आपण मागितलेली पूर्ण माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.फकरुद्दिन शरफुद्दीन शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सर्व माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

श्री.शेख यांनी गोदावरी बी सहकारी गृहरचना संस्थेचे अध्यक्ष म्हणून या संस्थेला दिलेल्या पाण्याच्या बिलाच्या अनुषंगाने सात मुद्दयांची माहिती मागितली होती. नगरपालिका पाण्याची काय व्यवस्था करणार आहे, अशा स्वरुपाच्या संकल्पित कार्यवाहीची माहिती वगळता व प्रभाग अधिकारी व मिटर निरीक्षक यांच्या नावाव्यतिरिक्त सर्व माहिती देण्यात आली. प्रभाग अधिकारी व

मिटर निरीक्षक यांची नावे देणे चुकून राहिले होते. प्रथम अपिलाच्या वेळी श्री.शेख यांनी ते निदर्शनास आणल्यानंतर तेथे ती नावे देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता श्री.रामदास तांबे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. श्री.तांबे यांनी आयोगापुढील सुनावणीत त्याचाच पुनरुच्चार केला. आपल्या गृहरचना संस्थेच्या संदर्भात वस्तुत: जी माहिती संस्थेकडेही असली पाहिजे अशी माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडे श्री.शेख यांनी मागितली आहे. सादर करण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी व प्रभाग अधिकारी यांचे निवेदन लक्षात घेता सर्व माहिती देण्यात आलेली आहे, असे दिसते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१.४.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.काशिनाथ जोगी सावंत (निवृत्त ऑ.कॅप्टन)
ई-३२८, त्रिदलनगर को.ऑ.हौ.सो.सर्व्हे नं.१९१(अ), येरवडा, पुणे-६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९४ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.काशिनाथ जोगी सावंत (निवृत्त ऑ.कॅप्टन)
ई-३२८, त्रिदलनगर को.ऑ.हौ.सो.सर्व्हे नं.१९१(अ), येरवडा, पुणे-६

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.प्रविण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.अशित जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.४.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>त्रिदलनगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, येरवडा, पुणे या गृहरचना संस्थेतील फ्लॅट नं.बी-५/२९ चे मूळ मालक ले.कर्नल आर.सी.मदन याच्याकडून हा फ्लॅट ३ जुलै १९९१ रोजी विंग कमांडर के.एम.कुलकर्णी यांनी विकत घेतला असे त्यांचे म्हणणे आहे. हा फ्लॅट कोणत्या वर्षी व किती तारखेला रजिस्टर्ड झाला, त्याची सरकारी नियमाप्रमाणे स्टॅम्प ड्यूटी भरली गेली किंवा नाही, तसेच रजिस्ट्रेशन फी नियमाप्रमाणे भरली गेली किंवा नाही. हा सेल स्थगित करण्यात आला, स्थगितीच्या कारणांची आदेश देतेवेळी पूर्तता करण्यात आली होती काय, नोंदीच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती. | |

## विवेचन

येरवडा, पुणे येथील त्रिदलनगर को-ऑप.हौसिंग सोसायटीमधील भ्रष्टाचाराबाबत आपण केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने व विंग कमांडर के.एन.कुलकर्णी (निवृत्त) हे आपण विकत घेतला असल्याचे सांगत असलेल्या सदनिकेची कागदपत्रे न मिळणे याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.काशिनाथ जोगी सावंत यांनी विविध अर्जांद्वारे जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. सोसायटीतील एफएसआयबाबतची माहिती हा त्यातील एक मुख्य विषय आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित कागदपत्रे तपासाकामी सीआयडीकडे असल्याचे कळविले. त्याविरुध्द श्री.सावंत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संस्थेत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे पुनर्लेखा परीक्षणात दिसत असतानाही व पोलीस आयुक्त, पुणे, पोलीस महासंचालक, मुंबई, सीबीआय मुंबई आदींना ते कळविण्याची कार्यवाही अजून का झाली नाही? शासकीय लेखा परीक्षकांनी आरोपींवर फिर्याद का दाखल केली नाही? शासन निर्णय डावलून भूखंड दिलेला असतानाही त्याबाबत कारवाई का होत नाही? अशा स्वरुपाचे प्रश्न 'माहिती'ची मागणी म्हणून श्री.सावंत यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलात नमूद केले आहेत.

उपनिबंधक, सहकारी संस्था व पुणे महानगरपालिका यांच्या अखत्यारीत संस्था येत असतानाही ते याबाबत कोणतीही कार्यवाही करीत नसल्याची तक्रारही त्यांनी नमूद केली आहे.

आपण सन १९९३ पासून हा विषय विविध अर्ज / तक्रारी आदी मार्गांनी अनेक पातळ्यांवर मांडत आलो आहोत. परंतु संबंधितांवर कारवाई केली जात नाही. विकसकाने शासन निर्णय डावलून भूखंड दिला असतानाही व व संस्थेत भ्रष्टाचार चालू असून सभासदांचे नुकसान होत असतानाही कारवाई केली जात नाही. 'चौकशी चालू आहे' असे उत्तर दिले जाते. सीआयडीकडे प्रकरण सोपविले असल्याचे आपल्याला कळविण्यात आले असले तरी तेही आपल्याला विलंबाने कळविण्यात आले, असे निवेदन श्री.सावंत यांनी केले.

संबंधित विषय तपासासाठी सीआयडीकडे असल्यामुळे सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे सोपविलेली आहेत, त्यामुळे कागदपत्राच्या प्रती देणे शक्य झाले नाही, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोर केले. सीआयडी विभागाकडील जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज पाठविण्याचा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला, त्यानुसार अर्ज पाठविल्याचे अपीलकर्ता यांना वीस दिवस उशिरा का कळविले, तसेच सीआयडीकडून संबंधित तपास पूर्ण झाला आहे की नाही व संबंधित धारिका नेमक्या कोठे आहेत, याबाबतचा खुलासा विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी करु शकले नाहीत. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शांताराम थोरात यांचा याबाबतचा खुलासा तीन दिवसात आयोगाला सादर करण्याचा तोंडी आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला.

सीआयडीकडील संबंधित अभिलेखाबाबतची सद्य:स्थिती जाणून घेऊन, तसेच तपास पूर्ण झाला असल्यास या अभिलेखामधील श्री.सावंत यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती महानगरपालिकेच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी प्राप्त करुन घेऊन नि:शुल्क पुरवाव्यात. या अनुषंगाने केलेल्या कारवाईचा अहवाल आयोगाला एक महिन्याच्या आत सादर करावा, असा तोंडी आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला.

आयोगाच्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता श्री.शांताराम थोरात, तत्कालीन नगर उपअभियंता श्री.अनिरुध्द पावसकर, तत्कालीन सहाय्यक अभियंता श्री.सुधीर कदम, तत्कालीन कनिष्ठ अभियंता श्री.पात्रे यांचा खुलासा, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठविलेले पत्र व त्यांचे उत्तर, अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह, पुणे यांना पाठविलेले पत्र यासह एकत्रित अहवाल जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका श्री.अशित वेदप्रकाश जाधव यांनी दि.६.९.२००८ रोजी आयोगाला सादर केला. यूएलसी तपासकामी संबंधित कागदपत्रे राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने जप्त केलेली असल्यामुळे माहिती त्वरित देता आली नाही, मात्र पोलीस उपनिरीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांना माहिती देण्याबाबत कळविले, परंतु तपास चालू असल्यामुळे ही कागदपत्रे उपलब्ध होऊ शकली नाहीत, असे तत्कालीन अधिकाऱ्यांनी खुलाशात नमूद केले आहे. तसेच मागितलेली माहिती प्रामुख्याने बांधकाम विभागाशी संबंधित असल्यामुळे व मूळ अर्ज त्यांच्याकडे दाखल असल्यामुळे त्यांनीच माहिती देणे अपेक्षित होते, असेही त्यांनी म्हटले आहे. आठ दिवसात कागदपत्रांच्या प्रती देण्याचा आयोगाचा आदेश असून राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे (सी.आय.डी.) यांचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दि.१३.८.२००८ रोजी पत्रान्वये त्यांना कळविले. 'त्रिदल सोसायटीच्या संदर्भातील तीन संदिग्ध फाईल्स दि.२७.११.२००५ रोजी बनावट यूएलसी आदेश प्रकरणी दाखल केलेल्या गुन्ह्यात पुणे महानगरपालिकेच्या

कार्यालयातून ताब्यात घेतल्या होत्या. दि.१६.७.२००८ रोजी या संचिका अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह, पुणे यांच्याकडे परत करण्यात आल्या आहेत,' असे पोलीस उपअधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, भरारी पथक, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.अ.सी.बागलकोट यांनी दि.२७.८.२००८ रोजी महानगरपालिकेच्या जन माहिती अधिकाऱ्यांना कळविले. त्यानुसार संबंधित संचिका उपलबध करुन देण्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह यांना महानगरपालिकेच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.२८.८.२००८ रोजी कळविले. परंतु हे पत्र आपल्या कार्यालयाला मिळाले नसल्याचे पुणे नागरी समूह कार्यालयातील श्रीमती पुरी यांनी आयोगाकडील विचारणेवर दि.१६.४.२००९ रोजी सागितले. संबंधित पत्राची प्रत आयोगाने त्यांना पुरविली. महानगरपालिकेचे जन माहिती अधिकारी श्री.अशित जाधव व अपिलीय प्राधिकारी श्री.प्रशांत वाघमारे यांनी माहिती देण्याच्या अनुषंगाने या विषयाचा पाठपुरावा तत्परतेने करणे आवश्यक होते, तो न केल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

दरम्यान, श्री.सावंत यांना संबंधित कागदपत्रे दि.१४.८.२००८ राजी समक्ष दाखविण्यात आली असता, त्यांना आवश्यक असलेली माहिती या कार्यालयातील कागदपत्रांमध्ये नसल्याचे व त्यामुळे त्यातील कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता नसल्याचे लेखी म्हणणे दिले आहे, असे अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह, पुणे श्री.आर.के.गायकवाड यांनी दि.२१.४.२००९ च्या निवेदनाद्वारे आयोगाला कळविले आहे.

श्री.सावंत यांनी महानगरपालिका, पोलीस, सहकार खाते अशा विविध खात्यांशी संबंधित अनेक प्रश्न एकत्रितपणे मांडले आहेत. 'माहिती' बरोबरच त्यांचे अनेक मुद्दे खुलासा विचारणारे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत खुलासा अथवा भाष्य यांची मागणी करता येणार नाही, तसेच प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीची दखल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये घेता येणार नाही. या बाबी लक्षात घेऊन श्री.सावंत यांनी त्या त्या विभागाकडील माहितीसाठी प्रत्येक विभागाकडे स्वतंत्र अर्ज करणे कार्यवाहीच्या दृष्टीने अधिक उचित ठरेल, याची समज श्री.सावंत यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) जन माहिती अधिकारी श्री.अशित वेदप्रकाश जाधव व अपिलीय प्राधिकारी श्री.प्रविण गेडाम यांनी अपीलकर्ता श्री.के.जे.सावंत यांना 'त्रिदलनगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, येरवडा, पुणे'बद्दलचे महानगरपालिकेतील अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावे व त्यातील त्यांना आवश्यक त्या प्रती निःशुल्क पुरवाव्या. कार्यवाहीचा पूर्तता अहवाल त्यांनी दि.५.५.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.४.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ०७-०२-२००९ रोजी पुणे / सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ८०३ / सांगली | श्रीमती रेखा बापू वाघमारे रा.मंगळवार पेठ , माळी गल्ली, सुतार वाडा, मिरज ४१६ ४१० | सेक्रेटरी , मिरज नगर परिषद सेवकांची पतसंस्था मर्या. लक्ष्मी मार्केट, मिरज | उपनिबंधक सहकारी संस्था मिरज ४१६ ४१० | अपीलकर्त्याचे पती बापु पांडुरंग वाघमारे हे सदर पतसंस्थेचे सन १९७९ ते २००३-२००४ कालावधीत कर्जदार होते का ? त्यांच्या ठेवी ,बचत ,सभासदत्व इत्यादीबाबत एकूण ०८ मुद्दयांची माहिती. |
| २ | ८०७ / सांगली | श्री.दादाराव भानुदास आलाट साठी आकाराम मारुती शिसाळ, माहितीचा अधिकार वापर अभियान कार्यालय, गट नं. ७६ मौजे, पलूस, मु.पो.ता.पलूस, जिल्हा सांगली | सहायक निबंधक, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कार्यालय, मार्केट यार्ड ,मु.पो.ता.पलूस, जिल्हा सांगली | सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय, नविन मध्यवर्ती इमारत, तिसरा मजला, पुणे | भारती नागरी सहकारी पतसंस्था मर्या. , पलूस या संस्थच्या अर्जदाराच्या मुदत ठेवीबाबत माहिती. |

विवेचन : -

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँका/पतसंस्था यांना लागू होत नाही, असा निर्णय मुंबई न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटीशन क्र. ५६६६/२००७ मध्ये दिला आहे. त्यानुसार वर नमूद केलेली अपिले दाखल करुन घेण्यायोग्य ठरत नाहीत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ व २ (क्र.८०३, ८०७ / सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ०८-०४-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. हरिचंद्र शामराव नागपुरे
रा.इमारत क्र.एम-१८/२०१६, महाराष्ट्र हौ. बोर्ड,
स.नं.१९१-अ, येरवडा, पुणे-६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग,
उप आयुक्त कार्यालय क्र.२,
ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महाागरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे महाागरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२३ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. हरिचंद्र शामराव नागपुरे
रा.इमारत क्र.एम-१८/२०१६, महाराष्ट्र हौ. बोर्ड,
स.नं.१९१-अ, येरवडा, पुणे-६

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महाागरपालिका, पुणे
श्री. गणपतराव साळुंखे

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग,
उप आयुक्त कार्यालय क्र.२, ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. जीवन सोनवणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.७.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

स.नं. १९१-अ येरवडा येथील बेकायदेशीर बांधकाम करून व्यवसाय करणेबाबत दिलेल्या नोटिशीच्या प्रती, भूखंडामधील दुकानाकरिता बांधकाम करण्यास दिलेल्या परवान्याची प्रत व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे (म्हाडा) यांच्याकडील मोकळ्या जागेत पिठाची गिरणी चालू करण्याबाबतचा आपला अर्ज फेटाळला. अर्ज का फेटाळला, तसेच इतर भूखंडांमधील दुकानांकरिता बांधकाम करण्यास कशी परवानगी दिली, अशा स्वरूपाची माहिती अपीलकर्ता श्री. हरिचंद्र शामराव नागपुरे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी समाधानकारक माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी अपील नाकारले. तसेच महापालिका आयुक्तांनीही आपली मागणी अमान्य केली, या कारणावरून श्री. नागपुरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे (म्हाडा) मधील खोका पध्दतीच्या गाळ्याबाबत श्री. नागपुरे यांची तक्रार आहे. त्याबाबत श्री. नागपुरे यांनी वेळोवेळी तक्रार अर्ज व माहिती अधिकारात अर्ज केले असून त्यावरील कार्यवाहीबाबत वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले. श्री. नागपुरे यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मूळ ओट्याव्यतिरिक्त केलेले विनापरवाना बांधकामाबाबत कारवाई करण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी दिले. त्यानुसार कार्यवाही सुरू करण्यात आली आहे, परंतु माजी सभासद, म.न.पा., पुणे सौ. निर्मला विल्सन हिरे व इतर यांनी कारवाई करण्यास अडथळा निर्माण केल्याने कारवाई थांबविण्यात आली, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी लेखी व तोंडी नमूद केले. अन्य गाळ्यांमध्ये व्यवसाय करण्यास कुठल्या नियमानुसार परवाने देण्यात आले आहेत, याची माहिती

देण्याबाबत परवाना प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे यांना देण्याबाबत कळविण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले. त्यानुसार या विभागाने दिलेली माहिती श्री. नागपुरे यांना देण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले. दि. १४.१२.२००७ रोजी माहिती दिलेल्या पत्राची प्रत त्यांनी आयोगाला सादर केली.

संबंधित जागेत आपल्याला पिठाची गिरणी सुरु करण्यास परवाना मिळावा, ही श्री. नागपुरे यांची मुख्य मागणी आहे. हा विषय प्रशासकीय कार्यवाहीत येत असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. ६ मीटर रूंदीचा रस्ता अद्यापपर्यंत का झलेला नाही, दुकानाला परवानगी देणार नव्हता, तर नकाशा मंजूर करून प्रमाणपत्र कसे दिले, अशा स्वरूपाचे स्पष्टीकरण त्याअनुषंगाने श्री. नागपुरे यांनी मागितले आहे. असे विचारणे ही 'माहिती' ठरत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ८.४.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम, दिनांक १८-०३-२००९ रोजी पुणे / सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८५८ / सांगली | श्री.राजाराम ज्ञानू कारकळ मणदूर,ता.शिराळा जिल्हा सांगली | ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत मणदूर, ता.शिराळा, जिल्हा सांगली | गटविकास अधिकारी, मणदूर, ता.शिराळा, जिल्हा सांगली | सन १९८२ मध्ये ग्रामस्थांकडून लोकवर्गणी गोळा जिल्हा परिषद , पंचायत समितीची मंजूरी घेतलेली होती का ? त्या पत्राची प्रत व वर्गणीबाबत व इतर एकूण ५ मुद्दयांची माहिती | अपील रद्द करण्याबाबत अपीलकर्त्याने दि. १७/३/२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| २ | ९११ / सांगली | श्री.शब्बीर अ. करिम मोमीन मोमीन मोहल्ला, इस्लामपूर, ता. वाळवा, जिल्हा सांगली | सहाय्यक नगररचनाकार, इस्लामपूर नगरपरिषद, ता.वाळवा, जि.सांगली | मुख्याधिकारी, गट अ , इस्लापूर नगरपरिषद, सांगली | इस्लामपूर येथील मु.घ.२०४३ सि.स.नं. ३६ ते ४३ मधील जीर्ण अवस्थेतील इमारतीबाबत | गैरसमजुतीने अपील केले आहे. वेगळा अर्ज करण्यात येईल, असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमुद केले आहे. |
| ३ | ८६१ / सांगली | श्री.शिवाजी आनंदा कापसे मु.पो.रेठरेधरण, ता.वाळवा, जिल्हा सांगली | मुख्याधिकारी इस्लामपूर नगरपरिषद, ता.वाळवा, जिल्हा सांगली | उपआयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे | नगरपालीका इस्लामपूर कार्यालयातील हालचाल रजिस्टर,हजेरी पट कार्यालयीन संरचना,कर्तव्य व कार्यपद्धती ३.६ मुद्दयांची माहिती. | आवश्यक माहिती मिळाली आहे, असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ८५५/ सांगली | श्री.गेबसो रावसो नाईक मु.घोलेश्वर, पो.निगडी खुर्द, ता.जत, जिल्हा सांगली | कार्यालय अधिक्षक, आस्था ३, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.रा.), पुणे | उप संचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे | सदर कार्यालयाचे पत्र क्र.एकक/घोलेश्वर/८४ पुणे दि.१५/११/१९८४ पत्राची प्रत व त्या अनुषंगाने एकूण १४ मुद्दयांची माहिती | आवश्यक माहिती प्राप्त झाली असून दुरुस्तीची कार्यवाही होणार असलेने त्यामुळे अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे दुरुस्तीची कार्यवाही करणे ही बाब माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ५ | ९०८ / सांगली | श्री.लकाप्पा तिप्पाण्णा खांडेकर मु.पो.पांडोझरी, ता.जत, जि. सांगली | सहा.अभियंता , महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी, जत, जिल्हा सांगली | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या. कवठेमहांकाळ जि.सांगली | ग्राहक नं. २७०८३०३६३३६७ बाबत एकूण ६ मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने कोणतीही तक्रार नाही, असे अपीलक- र्त्याने दि.१७/३/२००९ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक अभियंता, म.रा.वि.वि. कं. यांना कळविले . ही बाब जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ५ (क्र. ८५८, ९११, ८६१, ८५५, ९०८, / सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०६-०४-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम, दिनांक १८-०३-२००९ रोजी पुणे / सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८७९ / सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जि.सांगली | मा. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली | अतिरिक्त आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली | महानगरपालिकेत वायरमन कर्मचा -यांची कर्तव्य इ.बाबत ३ मुद्दयांची माहिती | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ८८० / सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जि.सांगलीारा | शहर अभियंता सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली | अतिरिक्त आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली | सन २००६ ते माहे ऑगस्ट २००८ या कालावधीतील लव्हली सर्कल ते साखर कारखाना १०० फुटी रोड पॅचवर्कबाबत (दुरुस्तीबाबत) एकूण ४ मुद्दयांची माहिती | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ८३७ / सांगली | श्री.विष्णू दत्तात्रय बर्वे समर्थ खादी भंडार, मेन रोड, सांगली | मुख्य लेखापाल, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | उप आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका , सांगली | महानगरपालिकेच्या एकूण किती प्राथमिक शाळा आहेत, शाळेचा पट शिक्षक संस्था, स्कॉलरशिप | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १५/४/२००९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | परीक्षेबाबत व शिक्षणाच्या सेवाविषयकबाबी ३.१३ मुद्दयांची माहिती | पर्यंत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | ८३८/ सांगली | श्री.विष्णू दत्तात्रय बर्वे समर्थ खादी भंडार, मेन रोड, सांगली | मुख्य लेखापाल, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | उप आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली | वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेमध्ये अर्थिक खाती उघडण्यासाठी महापालिका व तत्कालीन नगरपरिषदेने केलेल्या ठरावाची प्रत बँकेतील कर्मचारी , बँकेच्या निधी किती आहे ? इ. ७ मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १५/४/२००९ पर्यंत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | ८४२/ सांगली | श्री.शिवाजी आनंदा कापसे मु.पो.रेठरेधरण, ता.वाळवा, जिल्हा सांगली | कार्यकारी अभियंता, ताकारी पंपगृह विभाग क्रं.१, इस्लामपूर (पंठ वसाहत), जिल्हा सांगली | अधिक्षक अभियंता, कोयना कृष्णा उपसा सिचंन प्रकल्प मंडळ, सांगली | हजेरीपट,हालचाल रजिस्टर, कार्यकर्तव्य उदिष्ट पूर्तीबाबत माहिती , कामाचा दर्जा सुधारण्यासाठीच्या उपाययोजनेची माहिती ३.५ मुद्दयांची माहिती | ('माहिती'च्या व्याख्येनुसार देय ठरणारी) माहिती १५ दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ५ (क्र.८७९,८८०,८३७,८३८, व ८४२/ सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

२. वरील ज्या अपिलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ०८-०४-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधीर माधव जोशी
५८७, दत्तप्रसाद सोसायटी, पुणे सिंहगड रोड, पुणे-३० — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
नगर अभियंता कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९८ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
नगर अभियंता कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.प्रविण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.श्याम ढवळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.५.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे वडगाव बु., आनंदनगर येथील स.नं.१२/५/१ब व १२/६/६/२ येथील बांधकामाबाबत महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेले आदेश, त्या अधिकाऱ्यांचे नाव व पत्ते, टिपणी व इतिवृत्त, आरक्षणाची कागदपत्रे, आरक्षण रद्द केल्याच्या ठरावाची नक्कल, टिपणी, मंजूर नकाशा, प्लान मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे, १.३.१९९७ पासूनचे संबंधित जमिनीचे झोन प्रमाणपत्र. |

## विवेचन

पुणे येथील सिंहगड रोड परिसरातील वडगाव बु. येथील बांधकामासंबंधीची माहिती अपीलकर्ता श्री.सुधीर माधव जोशी यांनी जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. ती प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही पूर्ण न मिळाल्याच्या कारणावरुन व महानगरपालिकेच्या काही विभागांकडून कोणतीही माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन श्री.जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्या अर्जाची दखल घेतली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता श्री.प्रशांत वाघमारे यांनी १५ दिवसात माहिती देण्याचे आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दिले. तसेच विकास योजना विभागाशी संबंधित असलेल्या माहितीबाबत श्री.जोशी यांचा अर्ज विकास योजना विभागाकडे पाठवून सर्व माहिती श्री.जोशी यांनी १५ दिवसात द्यावी, असे आदेश श्री.वाघमारे यांनी दिले. परंतु त्यानुसारही संबंधित विभागांनी आपल्याला कोणतीही माहिती दिली नाही, असे श्री.जोशी यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. विलंब झाल्यावर माहिती नि:शुल्क देणे बंधनकारक असतानाही काही माहितीसाठी रु.२८/- शुल्क आकारण्यात आले आहे. ते परत मिळावे, अशी मागणीही श्री.जोशी यांनी केली आहे.

श्री.जोशी यांनी दि.२.३.२००७ रोजी अर्ज केला होता. त्यांनी मागितलेली माहिती बांधकाम नियंत्रण व विकास योजना या दोन विभागांशी संबंधित होती. दि.२८.३.२००७ अन्वये माहिती

देण्यात आली होती व बांधकाम प्रवर्तकाने प्रस्ताव दाखल केला नसल्याचे त्याना कळविले होते. त्यामुळे इतर मुद्दयांचे उत्तर देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. श्री.जोशी यांच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयानुसार दि.१०.५.२००७ रोजी श्री.जोशी यांनी अभिलेखाचे निरीक्षण केले. दि.२८.३.२००८ चे जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर व दि.३.५.२००८ रोजी अपिलाची सुनावणी या दरम्यान प्रस्ताव दाखल होऊन मान्य करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्यात आल्या, त्यासाठी रु.२८/- शुल्क आकारण्यात आले, हे शुल्क योग्य आहे. ऊर्वरित माहिती देण्याबाबत श्री.जोशी यांच्याशी वारंवार संपर्क साधला असता समक्ष माहिती घेण्याचे त्यांना कळवूनही प्रतिसाद न मिळाल्यामुळे दि.२६.११.२००७ रोजी माहिती टपालाने पाठविण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी श्री.श्याम ढवळे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे यांचा विचार करता त्या त्या वेळी असलेल्या वस्तुस्थितीची माहिती अपीलकर्त्यास देण्यात आलेली आहे. मात्र संबंधित बाबी तत्परतेने स्पष्ट करणे आवश्यक होते, ते केलेले नाही. यापुढील काळात याची पुनरावृत्ती होणार नाही व माहिती देण्यास विलंब केला जाणार नाही याची दक्षता घेण्यात येईल, असे विनंतीपूर्वक निवेदन जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता श्री.श्याम ढवळे यांनी दि.२२.८.२००८ रोजी (प्राप्त दि.२७.८.२००८) आयोगाला सादर केले आहे. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.४.२००९